28 SEP 2026

THE TIMES OF INDIA.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Visarjan noise hits rock concert levels at Mahadwar Road and Papachi Tickti

## 9 Kolhapur City Mandals Go Past 100 dB Mark

Abhijeet.Patil@timesofindia.com

**Kolhapur:** On Anant Chaturdashi, noise levels along Kolhapur's designated Ganesh immersion route soared to 101.3 decibels (db) at Mahadwar Road during the day and 101.9 db at Papachi Tikti at night — levels comparable to standing near the speakers at a live rock concert and capable of leaving ears ringing.

The immersion procession began on Friday morning and continued until 9am on Saturday, lasting nearly 24 hours. However, police barred the use of sound systems between midnight and 6am on Saturday.



Immersion procession at Papachi Tickti on Friday night

Students of Shivaji University Kolhapur (SUK), under the guidance of professors Asawari Jadhav and P D Raut of environmental science department, recorded the noise pollution levels in silent zones, commercial zones, industrial and residential zones during day time from 6am to 10pm and night time from 10pm to 6am.

According to the report, Mahadwar Road was the noisiest in day time and Papachi Tickti during night. Along the immersion routes, traffic was prohibited and the shops were shut. The noise recorded, therefore, was that of the sound systems, traditional bands, announcements made by authorities and the political parties and also that of a sea of people moving along the stretch, sometimes stopping and dancing to the tunes of the music played.

A study found sound levels on immersion day in 2025 were higher than the previous year. Gujari Corner recorded the highest levels, at 98.20 dB during the day and 90.75 dB at night.

The immersion procession falls under a commercial zone where, as per Central Pollution Control Board, a limit of 65dB is permitted during day time and 55 dB during night time. "During day time traditional instruments were played, during night time the sound systems were used. There was commotion along the immersion route. There was high decibel noise during a short period," Jadhav, head of the environmental science department, said.

In silent zones — CPR Hospital, Court, Collector's Office — the noise levels of 50 dB during day time and 40 dB during night time were breached. At court, 71.7 dB was recorded during day time and 70.6 dB during night time.

The police recorded the sound levels of each mandal that used sound systems. According to the primary findings, nine mandals recorded sound levels above 100 dB and six above 90 dB. The police are going to take action against these and others which have breached the levels.

2 8 SEP 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा

# विसर्जन मिरवणुकीत आवाज शंभर डेसिबल पार

## महाद्वार रोडवर दिवसा १०१.३, पापाची तिकटी येथे रात्री १०१.९ डेसिबल

कोल्हापूर, ता. २७ : अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोल्हापूर शहरातील प्रमुख मार्गांवर ध्वनिप्रदूषणाची पातळी वाढल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने केलेल्या ध्वनी मापनातून स्पष्ट झाले. महाद्वार रोड येथे दिवसा १०१.३ डेसिबल, तर पापाची तिकटी येथे रात्री १०१.९ डेसिबल ध्वनीची नोंद झाली. विसर्जन मिरवणुकीतील बहुतांश ठिकाणी ध्वनीची पातळी निर्धारित मानकांपेक्षा अधिक राहिली. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, सहयोगी प्राध्यापक डॉ. पी. डी. राऊत, वैज्ञानिक सहायक अमित माने, एम.एस्सी.चे विद्यार्थी इंद्रजित शेनोळीकर, श्रुतिका चौधरी यांनी ध्वनी मापन केले.

### आवाजाची पातळी किंचित कमी

पर्यावरणशास्त्र विभागाने एकूण ३० ठिकाणी आवाजाचे मोजमाप केले. एकूणच यंदा दिवसा पारंपरिक वाद्यांचा, तर रात्री ध्वनिवर्धक यांचा वापर झाला. यासह मिरवणूक मार्गांवर गोंगाट होता.




पोलिस प्रशासनाच्या योग्य नियोजनामुळे ध्वनिवर्धक रात्री १२ वाजता पूर्ण बंद केले. दरवर्षी दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत चालू राहणारी मिरवणूक रात्री तीन वाजता संपली. त्यामुळे एकूणच मोठ्या आवाजांचा कालावधी कमी झाला आणि गतवर्षीपेक्षा यावर्षी आवाजाची पातळी किंचित कमी राहिली. औद्योगिक क्षेत्र आणि शिवाजी विद्यापीठ परिसर वगळता सर्वच ठिकाणी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनापेक्षा आवाजाची पातळी जास्त असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.



### रात्री आवाजाचा कहर

रात्रीच्या वेळेतही अनेक ठिकाणी ध्वनीची पातळी वाढल्याचे मापनातून दिसून आले. मिरजकर तिकटी येथे ८३.४ डेसिबल, बिनखांबी येथे ८५.३, महाद्वार रोड येथे ८५.७, गुजरी कॉर्नर येथे ८५.५, पापाची तिकटी येथे तब्बल १०१.९ डेसिबल ध्वनी नोंदविण्यात आला. गंगावेश येथे ८६.४, इराणी खण येथे ७३.८, छत्रपती शिवाजी महाराज चौकात ८१.७, बिंदू चौकात ८१.३ आणि आझाद चौकात ६५.८ डेसिबल ध्वनींची नोंद झाली. उमा टॉकीज परिसरात रात्री ६९.६, सावित्रीबाई फुले रुग्णालय परिसरात ७७.२, रेणुका मंदिर येथे ७६.४, हॉकी स्टेडियम येथे ७२.७, तर संभाजीनगर येथे ७०.२ डेसिबलची नोंद झाली.

**विसर्जन मिरवणूक मार्गावरील ध्वनी पातळी (डेसिबलमध्ये)**

| ठिकाण | दिवसा | रात्री |
|---|---|---|
| मिरजकर तिकटी | ७६.९ | ८३.४ |
| बिनखांबी | ९५.० | ८५.३ |
| महाद्वार रोड | १०१.३ | ८५.७ |
| गुजरी कॉर्नर | ९८.७ | ८५.५ |
| पापाची तिकटी | ८९.९ | १०१.९ |
| गंगावेश | ८४.३ | ८६.४ |
| इराणी खण | ८८.८ | ७३.८ |
| शिवाजी महाराज चौक | ८५.९ | ८१.७ |
| बिंदू चौक | ७७.८ | ८१.३ |
| आझाद चौक | ७१.० | ६५.८ |
| उमा टॉकीज | ७४.२ | ६९.६ |
| सावित्रीबाई रुग्णालय | ६८.२ | ७७.२ |
| रेणुका मंदिर | ८०.९ | ७६.४ |
| हॉकी स्टेडियम | ७५.२ | ७२.७ |
| संभाजीनगर | ७७.४ | ७०.२ |

28 SEP 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मिरवणुकीत ध्वनी मर्यादा धाब्यावर

## पापाची तिकटीजवळ सर्वाधिक १०१.९ डेसिबल आवाज; विसर्जन मार्गावर सर्वच ठिकाणी आवाजाची मर्यादा ओलांडली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

**साऊंड सिस्टीमच्या कर्णकर्कश दणदणाटाने ध्वनिप्रदूषणाचे सारे नियम अक्षरशः धाब्यावर बसवले. साऊंड सिस्टीमच्या दणदणाटामुळे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची अक्षरशः ऐशी की तैशी झाल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या मोजमापातून समोर आले आहे. अनंत चतुर्दशीला मिरवणूक मार्गावरील १५ ठिकाणी केलेल्या ध्वनिमापनात दिवसा महाद्वार रोडवर तब्बल १०१.३ डेसिबल तर, रात्री पापाची तिकटी येथे तब्बल १०१.९ डेसिबल आवाजाची नोंद झाली. एवढ्या तीव्र आवाजाचा कानांवर परिणाम होऊ शकतो.**

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने अनंत चतुर्दशीदिवशी विसर्जन मार्गावरील १५ ठिकाणी आवाजाच्या तीव्रतेचे मोजमापन केले. यात गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावर ध्वनिप्रदूषणाची तीव्रता स्पष्टपणे जाणवली. रात्री विसर्जन मिरवणुकीत साऊंड सिस्टीमचा दणदणाट किती तीव्र होता, याची कल्पना पापाची तिकटी येथे नोंदलेल्या १०१.९ डेसिबल आवाजावरून येते. निर्धारित मर्यादा दिवसा ६५ आणि रात्री ५५ डेसिबल आहे. विशेष म्हणजे, रात्रीच्या १५ पैकी कोणत्याही ठिकाणी ध्वनी पातळी निर्धारित ५५ डेसिबलच्या मर्यादेत राहिली नाही.

सायलंट झोनमध्येही ध्वनिप्रदूषणाची स्थिती गंभीर राहिल्याचे मोजमापातून स्पष्ट होते. केवळ शिवाजी विद्यापीठ परिसरातच दिवसा ४८.२ आणि रात्री ३९.१ डेसिबल अशी मर्यादित ध्वनी पातळी राहिली. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने केलेल्या निरीक्षण पथकात विभागप्रमुख डॉ. ए. एस. जाधव, डॉ. पी. डी. राऊत, अमित आर. माने, इंद्रजित पी. शेनोळिकर, श्रुतिका वाय. चौधरी यांचा समावेश होता.

### शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचा अहवाल

- महाद्वार रोड, पापाची तिकटी येथे सर्वाधिक आवाज
- अनेक ठिकाणी आवाज ७० ते ९० डेसिबलच्या पुढे
- पारंपरिक वाद्यांपेक्षा ध्वनिवर्धकांचा आवाज अधिक



“ यंदा पारंपरिक वाद्यांचा वापर दिवसा आणि ध्वनिवर्धकांचा वापर रात्री अधिक झाल्याचे मोजमापातून दिसून आले. रात्री १२ वाजता ध्वनिवर्धक बंद करण्यात आल्यामुळे आवाजाचा कालावधी कमी झाला. तरीदेखील औद्योगिक क्षेत्र आणि शिवाजी विद्यापीठ परिसर वगळता इतर ठिकाणी व विसर्जन मिरवणुकीत सर्व ठिकाणी आवाजाची पातळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक राहिली.

**- डॉ. ए. एस. जाधव,**
शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र,
विभागप्रमुख

| मिरवणूक मार्ग ठिकाण | दिवस | रात्र |
|---|---|---|
| मिरजकर तिकटी | ७६.१ | ८३.४ |
| बिनखांबी | ९५.० | ८५.३ |
| महाद्वार रोड | १०१.३ | ८५.७ |
| गुजरी कॉर्नर | ९८.७ | ८५.५ |
| पापाची तिकटी | ८९.९ | १०१.९ |
| गंगावेश | ८४.३ | ८६.४ |
| इराणी खण | ८८.८ | ७३.८ |
| छत्रपती शिवाजी चौक | ८५.९ | ८१.७ |
| बिंदू चौक | ७७.८ | ८१.३ |
| आझाद चौक | ७१.० | ६५.८ |
| उमा टॉकीज | ७४.२ | ६९.६ |
| सावित्रीबाई फुले हॉल | ६८.२ | ७७.२ |
| रेणुका मंदिर | ८०.१ | ७६.४ |
| हॉकी स्टेडियम | ७५.२ | ७२.७ |
| संभाजीनगर | ७७.४ | ७०.२ |

सीपीसीबी आवाज मर्यादा : दिवस ६५ | रात्र ५५ डेसिबल

2 8 SEP 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात विसर्जन मिरवणुकीत आवाजाची पातळी वाढलेलीच

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाकडून ध्वनिप्रदूषणाचा अभ्यास

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर शहरात अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाद्वारे शहरातील विविध ३० भागांत आवाजाच्या पातळीचे मोजमाप करण्यात आले. प्रमुख ठिकाणे, रस्ते आणि चौकांमध्ये दिवसा व रात्रीच्या वेळी ध्वनिमापक यंत्राच्या साहाय्याने ही पाहणी करण्यात आली. या पाहणीनुसार विसर्जन मिरवणूक मार्गावर आणि व्यापारी तसेच शांतता क्षेत्रात ठरवून दिलेल्या मर्यादांपेक्षा आवाजाची पातळी कित्येक पटींनी जास्त असल्याचे समोर आले.

अहवालानुसार, विसर्जन मिरवणुकीच्या मुख्य मार्गांवर आणि संवेदनशील परिसरांमध्ये ध्वनिप्रदूषणाची पातळी ओलांडणारी ठरली. प्रशासनाने शांतता क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या परिसरांमध्येही दिवसा व रात्रीच्या वेळी आवाजाची पातळी निकषांपेक्षा उच्च पातळीवर नोंदवली गेली. तसेच व्यावसायिक आणि रहिवासी क्षेत्रांमध्येही ध्वनिप्रदूषणाचा त्रास सहन करावा लागल्याचे अहवालातून समोर आले आहे.

### मिरवणूक मार्गावरील ठिकाणे आणि आवाजाची पातळी

**महाद्वार रोड** : दिवसा १०१.३ डीबी (मानकः ६५), रात्री ८५.७ डीबी (मानकः ५५). **गुजरी कॉर्नर** : दिवसा ९८.७ डीबी, रात्री ८५.५ डीबी. **बिनखांबी मंदिर परिसर** : दिवसा ९५ डीबी, रात्री ८५.३ डीबी. **पापाची तिकटी**: दिवसा ८९.९ डीबी, रात्री १०१.९ डीबी. **इराणी खाण** : दिवसा ८८.८ डीबी, रात्री ७३.८ डीबी. **छत्रपती शिवाजी चौक** : दिवसा ८५.९ डीबी, रात्री ८१.७ डीबी. **गंगावेश** : दिवसा ८४.३ डीबी, रात्री ८६.४ डीबी. **बिंदू चौक** : दिवसा ७७.८ डीबी, रात्री ८१.३ डीबी. **मिरजकर तिकटी** : दिवसा ७६.१ डीबी, रात्री ८३.४ डीबी. **उमा टॉकीज** : दिवसा ७४.२ डीबी, रात्री ६९.६ डीबी. **आझाद चौक** : दिवसा ७१ डीबी, रात्री ६५.८ डीबी. **सावित्रीबाई फुले हॉस्पिटल** : दिवसा ६८.२ डीबी, रात्री ७७.२ डीबी.

28 SEP 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

एमपीसीबीच्या उपलब्ध नोंदींवरून स्पष्ट : पुणे- मुंबईपेक्षा एअर क्वालिटी इंडेक्सची स्थिती दिलासादायक

# कोल्हापूरच्या हवेत शुद्ध श्वास

**शहरांचा झपाट्याने वाढणारा विस्तार, वाहनांची वाढती संख्या, बांधकामे, कारखाने, रस्त्यांवरील धूळ आणि औद्योगिक उत्सर्जनामुळे हवेची गुणवत्ता हा नागरिकांच्या आरोग्याशी निगडित महत्त्वाचा विषय बनला आहे. मात्र, कोल्हापूरकरांसाठी सध्याची हवेची स्थिती चांगली म्हणण्यापेक्षा दिलासादायक आहे. पावसाळ्यातील पाऊस आणि वाऱ्यामुळे हवेत मिसळलेले धूलिकण कमी होण्यास मदत होत असल्याने शहरातील हवेची गुणवत्ता सध्या तुलनेने चांगली असल्याचा एमपीसीबीच्या उपलब्ध नोंदींवरून दिसून येत आहे.**






कोल्हापूर- शिवाजी विद्यापीठ परिसरात एमपीसीबीने हवेचा निर्देशांक मोजण्यासाठी बसवण्यात आलेला डिजिटल बोर्ड.

| दामाजी जाबीर

**कोल्हापूर :** कोल्हापुरात शहरात एमपीसीबी मार्फत २ ठिकाणी डिजिटल आणि ३ ठिकाणी मॅन्युअल पद्धतीने हवेचे निरीक्षण केले जाते. यासाठी शिवाजी विद्यापीठ परिसर, महाद्वार रोड आणि रुईकर ट्रस्ट येथे निरीक्षण केंद्रे आहेत. याद्वारे वातावरणातील विविध प्रदूषकांचे प्रमाण नियमितपणे नोंदविले जाते. ही निरीक्षण केंद्रे विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागामार्फत कार्यरत आहेत.

यातील नोंदीनुसार पावसाळी महिन्यांत शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स) तुलनेने चांगला दिसून आला आहे. पावसामुळे हवेत तरंगणारे धूलिकण जमिनीवर बसतात, तर वाऱ्यामुळे प्रदूषकांचे विखुरण होण्यास मदत होते. परिणामी, पावसाळ्यात पीएम १० आणि पीएम २.५ या सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण तुलनेने कमी राहण्याची शक्यता असते. उपलब्ध निरीक्षणांमध्ये शिवाजी विद्यापीठ परिसरात चांगली आणि समाधानकारक हवेची गुणवत्ता आढळल्याचे नमूद आहे.

सप्टेंबर महिन्यातील उपलब्ध नोंदीनुसार कोल्हापूरचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक २७ आहे. ही पातळी उत्तम श्रेणीत येते. यावेळी पीएम १० चे प्रमाण सुमारे २२, तर पीएम २.५ चे प्रमाण सुमारे ६ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर नोंदले गेले. उपलब्ध शहरनिहाय नोंदीनुसार कोल्हापूर शहरांमधील हवा उत्तम श्रेणीत आहे.

## एअर क्वालिटी इंडेक्स काय आहे ?

**हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स) हा हवेतील प्रदूषणाची पातळी दर्शविणारा निर्देशांक आहे. हवेत असलेल्या सूक्ष्म धूलिकणांसह (पीएम २.५), मोठ्या आकाराच्या धूलिकण (पीएम १०), नायट्रोजन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड, ओझोन आदी प्रदूषकांच्या प्रमाणावरून हा निर्देशांक निश्चित केला जातो. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या राष्ट्रीय वर्गीकरणानुसार ० ते ५० उत्तम, ५१ ते १०० समाधानकारक, १०१ ते २०० मध्यम, २०१ ते ३०० खराब, ३०१ ते ४०० अतिशय खराब आणि ४०१ ते ५०० गंभीर अशी हवेच्या गुणवत्तेची वर्गवारी केली जाते. ० ते ५० या पातळीवरील हवा आरोग्यासाठी चांगली मानली जाते.**

**“गेल्या तीन महिन्यांत पावसामुळे हवेमधील धूलिकणांचे प्रमाण कमी राहिल्याने शहरातील एअर क्वालिटी इंडेक्स चांगला राहिला आहे. मात्र, पावसाळा संपल्यानंतर रस्त्यांवरील धूळ वाढल्यास हवेत पुन्हा धूलिकणांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्त्यांची नियमित स्वच्छता, धूळ नियंत्रण आणि बांधकामाच्या ठिकाणी आवश्यक खबरदारी घेतल्यास हवेची चांगली गुणवत्ता कायम ठेवण्यास मदत होईल.**

**■ डॉ. आसावरी जाधव,**
**पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

मात्र शहराचा वाढता विस्तार, वाहनांची संख्या, रस्त्यांवरील धूळ, बांधकामांमधून निर्माण होणारे धूलिकण आणि औद्योगिक उत्सर्जनामुळे भविष्यात हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याची चांगली हवा कायम ठेवण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर, कचरा न जाळणे, बांधकामस्थळी धूळ नियंत्रण, रस्त्यांची नियमित स्वच्छता आणि प्रदूषण करणाऱ्या घटकांवर प्रभावी नियंत्रण यांसारख्या उपाययोजना आवश्यक आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 SEP 2026

जनप्रवास

# जयसिंगपूर कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**जयसिंगपूर :** शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा एकदिवसीय जिल्हास्तरीय युवा महोत्सव मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न ८६ महाविद्यालयांमधील सुमारे १,५२० विद्यार्थी कलाकार सहभागी होणार आहेत. अशी माहिती प्राचार्य डॉ. सुरत मांजरे यांनी दिली. युवा महोत्सवामध्ये लोकनृत्य, लोककला, मूकनाट्य, लघुनाटिका, लोकसंगीत, एकल लोकवाद्य वादन, वादविवाद, मराठी, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व, पथनाट्य, प्रश्नमंजुषा, एकांकिका, सुगम गायन, भारतीय समूहगीत आणि एकपात्री अभिनय आदी स्पर्धांचा समावेश आहे. या महोत्सवाचे उद्घाटन सकाळी ९.३० वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. सुभाष अडदंडे असून सचिव डॉ. महावीर अक्कोळे, स्थानिक संयोजन सचिव प्रा. डॉ. संदीप तापकीर तसेच संयोजन समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 SEP 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात ३० सप्टेंबरला 'व्हॉईस ॲक्टिंग' कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. फिल्ममेकिंग विभाग आणि विंडोज फिल्म प्राडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्हॉईस ॲक्टिंग' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि.३०) सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत मास कम्युनिकेशन विभागात ही कार्यशाळा होणार आहे. व्हॉईस आर्टिस्ट व लेखक भरत दैनी हे कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. चित्रपट, दूरदर्शन, जाहिरात, डबिंग तसेच विविध दृकश्राव्य माध्यमांमध्ये आवाजाचा प्रभावी वापर, आवाजातील चढ-उतार, संवाद फेक, व्यक्तिरेखेनुसार आवाजातील बदल, आवाजासाठी योग व प्राणायाम आदी बाबींवर ते मार्गदर्शन करणार आहेत. बी.ए. फिल्ममेकिंग विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि विंडोज फिल्म प्रॉडक्शन, कोल्हापूरचे संचालक चंद्रशेखर गुरव यांनी कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळा सर्वांसाठी खुली असून, इच्छुकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशन विभागाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 SEP 2026
जनप्रवास

# मौनी विद्यापीठात बुधवारी शैक्षणिक 'मुक्त संवाद'

- शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत प्रमुख पाहुणे
- 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण-शहरी शैक्षणिक दरी कमी करणे' याविषयी 'मुक्त संवाद'

**जनप्रवास : गारगोटी**

येथील श्री मौनी विद्यापीठाच्यावतीने ग्रामीण भागातील शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, तंत्रज्ञानस्नेही आणि भविष्याभिमुख करण्याच्या उद्देशाने भुदरगड तालुक्यातील शिक्षक व संस्था प्रतिनिधी यांच्यासाठी 'मुक्त संवाद' हा विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. बुधवारी (दि. ३०) सकाळी ११ वाजता श्री मौनी विद्यापीठातील प्रांगणातील जी. टी. सी. हॉलमध्ये हा कार्यक्रम होईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असतील. नाबार्डचे माजी अध्यक्ष व श्री मौनी विद्यापीठाचे महासंचालक डॉ. यशवंत थोरात हे विषयाची सविस्तर मांडणी करून ग्रामीण शिक्षणाच्या संदर्भातील तंत्रज्ञानाच्या संधी, आव्हाने आणि भविष्यातील दिशा यावर उपस्थितांना मार्गदर्शन करतील. या कार्यक्रमासाठी गरवारे टेक्निकल फायबर्स पुणेचे प्रमुख डॉ. संजय चराटी, डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवश्री सतेज पाटील व राजाराम कॉलेजच्या माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक अंतर वेगाने वाढण्याची शक्यता आहे. हे अंतर कमी करण्यासाठी ग्रामीण शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील नेतृत्वाने एकत्र येणे आवश्यक आहे. या संवादाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील अडचणी मांडून, अनुभवांची देवाणघेवाण करून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रज्ञानयुक्त शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत ठोस व व्यवहार्य उपायांवर चर्चा घडवून आणली जाईल, हा मुक्त संवाद कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे.

पत्रकार परिषदेस मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई, संचालक डॉ. पी. बी. पाटील, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे, उपप्राचार्य डॉ. एस. बी. देसाई आदी उपस्थित होते.